बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि २९ नोव्हेंबर २०२५**

# फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८७१/२०२५ भा.न्या.सहित क ११८(१),११९(१),१८९(१),१८९(१)(२), ३५१, ३५२ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ३१/०८/२०२५ रोजी ११.१५ वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २८/११/२०२५ रोजी १७.३४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | आशा संजय पाटणे, वय- २९ वर्षे, रा. मंजुळा सोसायटी शिवाजी नगर, बाळे, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सुगंधा- सासु, २) बलभीम- सासरा, ३) ऐश्वर्या- नणंद, ४) सोनाली, ५) तिचा पती अतिनाथ, ६) प्रतिक, ७) प्रेम परदेशी |
| **गेला माल** | | ९९,९९२/- रु त्यात ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी मंगळसुत्र, १.७ ग्रॅमचे ईअरिंग, २ ग्रॅमची सोन्याची अंगठी, मोटोरोला एज फयुजण मोबाईल असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे राहते घरी यातील वरील आरोपीत मजकुर यांनी घरात येवून, फिर्यादी व तिचे पतीला घरामध्ये राहण्याचे वादावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच फिर्यादीचे पतीचे अंगावर पेट्रोल टाकले व विटेच्या तुकडयाने फोकुन मारले व नमुद वर्णनाचा व किंमतीचा ऐवज घेवून गेले आहे म्हणून. तपास:-सपोनि- पाटील- **८७७९३९७११२** |

# फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८७२/२०२५ भा.न्या.सहित क ११८(२),११५(२),३५२,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २८/११/२०२५ रोजी १०.०० वा चे सुमारास, बुधवार पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २८/११/२०२५ रोजी १७.३४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | मनोज सिद्राम बंदपट्टे, वय- ३४ वर्षे, रा. ६०, बधवार पेठ, वडार गल्ली, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सदिप धोत्रे, २) गोविंद धोत्रे, ३) व्यंकटेश धोत्रे, सर्व रा. बुधवार पेठ, वडार गल्ली, सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे मामा आरोपीत क्रं १ याचे घरी लग्नामध्ये फिर्यादीची पत्नी संध्या हिला का शिवीगाळ केली हे विचारणा करीता गेले असता वरील आरोपीतांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन हाताने तसेच आरोपीत क्रं ३ याने लाकडी बांबुने मारहाण केली. संगिता ही भांडण सोडविण्यासाठी मध्ये आली असता तिला पण आरोपीत क्रं. ३ याने लाकडी बांबुने मारहाण केली आहे म्हणून. तपास:- पोना/ १४२१ मुलाणी- |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५८७/२०२५ भा.न्या.सहित क ८५,११५(२),३५१(२),३५२,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०८/१२/२०२३ रोजी ते दि. २१/०७/२०२५ रोजी चे दरम्यान, फिर्यादीचे सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २८/११/२०२५ रोजी १७.४० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अश्विनी रोहित चव्हाण, वय- २३ वर्षे, सध्या रा. लक्ष्मीपरु वाडी गांधी नगर, शहाबाद, ति. कलबुर्गी, राज्य- कर्नाटक |
| **आरोपीचे नाव** | : | १) रोहित- पती, २) राजु- सासरे, ३) बबिता- सासु, ४) रोशन- दिर, सर्व रा. नेहरु नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील नमुद आरोपीत मजकुर यांनी मिळुन फिर्यादीस तु बाहेर कामाला जा, कामाला गेली नाहीतर तुला जेवण मिळणार नाही असे म्हणून शिवीगाळ करुन, मानसीक त्रास देवून, लग्नात आम्हाला पाहिजे तेवढे हुंडा, सोने दिले नाही, मानपान केला नाही असे म्हणून हाताने मारहाण करुन शारीरीक व मानसिक त्रास दिला तसेच दिवसभर जेवण न देणे टोचुन बोलणे असे कृत्य करत होते आरोपीत क्रं. ४ हा फिर्यादीस तुला काहीच काम येत नाही कशाला हिला नग्न करुन आमच्या घरी आणले असे म्हणून शिवीगाळ केली. फिर्यादी माहेरी गेल्यावर आरोपीतांनी नांदवण्यास घेवून जाणार नसल्याने फिर्यादीस समजुन आल्याने फिर्यादीची वरील आरोपीताविरुध्द तक्रार आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १२०१ जाधव- ९८५०६६०२९९ |